# महाराष्ट्र शासन
# गृह विभाग
# पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.
# मुंबई पोलीस शिपाई चालक भरती २०१९
# शुध्दीपत्रक

दिनांक ३०.११.२०१९ रोजी पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई चालक (गट-क) ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक महापरिक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. ह्या जाहिरातील स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकुण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार पोलीस आयुक्त बृहन्मुंबई कार्यालयास राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यात आले होते. त्या अनुषंगाने त्यामध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहे :-

१. **मुद्दा क्रमांक ५** :-''ऑनलाईन परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या'' ऐवजी**''ऑफलाईन OMR based परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या''**असे वाचावे.

२. **मुद्दा क्र.११.१३ आणि १३.३** मध्ये ''उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल''हे शब्द वगळण्यात येत असून त्या ऐवजी **''उमेदवाराच्या परीक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या लेखी परीक्षा केंद्रावर नमूद दिनांकास उमेदवाराने लेखी परीक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे.''**

३. **सदरील जाहिरातीत जेथे जेथे** "ऑनलाईन परीक्षा''असे नमूद केले आहे त्या सर्व ठिकाणी ''ऑफलाईन परीक्षा''असे वाचावे.

४. **मुद्दा क्र. ८ : -महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक राआधो ४०३९ /प्र.क्र.३१/ १६ - अ, दिनांक ३१/०५/२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे शासन निर्णय दि. ३१.०५.२०२१ व शासन निर्णय , सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०२० /प्र.क्र.३२०/ १६ ब दि. ०५.०७.२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागा अराखीव (खुल्या) प्रवर्गात सामाविष्ठ करण्यात आल्या असल्याने सुधारित जागांचा तक्ता खालील प्रमाणे.**

| | अ.जा. | अ.ज. | वि.ज.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र. | इ.मा.व. | इ.डब्लू.एस. | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | **20** | **11** | **4** | **3** | **5** | **4** | **4** | **29** | **16** | **60** | **156** |
| कप्पीकृत आरक्षण ↓ | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 6 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 10 | 5 | 17 | 50 |
| महिला ३० % | 6 | 3 | 1 | 1 | 2 | 1 | 1 | 9 | 5 | 18 | 47 |
| माजी सैनिक १५ % | 3 | 2 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 4 | 2 | 9 | 24 |
| अंशकालीन ५ % | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 7 |
| खेळाडू ५ % | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 7 |
| गृहरक्षक ५% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 7 |
| प्रकल्पग्रस्त ५% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 7 |
| भुकपग्रस्त २ % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 2 |
| पोलीस पाल्य ३% | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 4 |
| अनाथ १% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| **एकूण** | **20** | **11** | **4** | **3** | **5** | **4** | **4** | **29** | **16** | **60** | **156** |

२...

**तसेच सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता दिलेले आरक्षण रद्द झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदन पत्र भरले होते, त्यांच्याकरीता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-**

(i) मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटिशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व इडब्ल्यूएस प्रवर्गातून विचार करण्यात यावा व असे करताना एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गाकरीता विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्याबाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परीक्षा शुल्काची सवलत कायम ठेवण्यात येत आहे.

(ii)मा. सर्वोच्च न्यायालयाने सव्हिील पिटिशन क्र.३१२३/२०२० मध्ये दि. ५ मे २०२१, रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार भरती प्रक्रिया राबविण्यात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २०२० / प्र.क्र. ३२० /१६-ब, दिनांक ५.७.२०२१ मधील परिच्छेद क्र.७ मधील तरतुर्दीनुसार एसईबीसी वर्गाकरीता राखीव असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करून व एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांकडून **'अराखीव'**अथवा**'आर्थिकदृष्टयामागास'**प्रवर्गाचा विकल्प घेऊन पूर्व परीक्षेचे आयोजन करावे असे नमुद आहे.

(iii)उपरोक्त शासन निर्णयास अनुसरून ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अशा उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दुर्बल घटक (EWS)आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव(खुला) यापैकी एक विकल्प निवडावा.

(iv)जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक (EWS)आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छुक / पात्र असतील तर त्यांनी संकेत स्थळावर जाऊन (EWS)विकल्प निवडावा.

(v) ४(iv)वगळता **(EWS)न निवडलेल्या** उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन **अराखीव(खुला)ह्यावर क्लिक करून अराखीव (खुला)पदाचा** विकल्प निवडावा.

(vi)एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी शारिरीक चाचणीच्या वेळी आर्थिक दुर्बल घटकाबाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे. जे उमेदवार प्रमाणपत्र सादर करणार नाही, त्यांना पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. तसेच त्यांना त्या वेळी प्रवर्ग बदलता येणार नाही.

**(vii)सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना आर्थिक दृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव (खुलाप्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्लुएस प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलिअेर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६/०७/२०२१ तरतूदीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

**१.निवड प्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहिरातीमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षण लागू आहे. अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षणअनुज्ञेय करतांना, सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परीक्षांसाठी मार्च २०२० व सन २०२०-२१ मधील परीक्षांसाठी मार्च २०२१ पर्यंत ग्राहय असणारे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

**२.ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला)असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदाची / परीक्षेची जाहिरात (दोन किंवा अधिक टप्प्याची परीक्षा असल्यास पूर्व परीक्षेची प्रसिध्द झालेली आहे त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्तकेलेले नॉन क्रिमिलेअर (NCL)प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राहय धरण्यात यावे.**

(viii)आर्थिक दुर्बल घटक (EWS)व अराखीव(खुल्या) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस कॉर्नर या बटनावर क्लिक केल्यानंतर पोलीस भरती २०१९ वर क्लिक करावे. त्यानंतर Web link क्लिक करून उमेदवारांनी ज्या घटकासाठी आवेदन पत्र सादर करण्यात केलेले आहे. त्या घटकासाठी URL देण्यात आलेला आहे, त्यावर क्लिक करावे व त्या सूचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

(ix)**विशेष सूचना:-प्रत्येक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेत स्थळावर जाऊन त्यांनी ज्या घटकांतर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहे त्या घटकांतर्गत निवड करून उमेदवारांनी स्वत:चा Password बदल करून घ्यावा.**

(x)एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना **'अराखीव'**अथवा**'आर्थिक दृष्टया मागास'** प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दि. ५.०८.२०२१ पासून ते दिनांक १५.०८.२०२१ रोजी २४.०० वा. पर्यंत उपलब्ध राहिल.

(गीता चव्हाण)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२),
पोलीस आयुक्त कार्यालय बृहन्मुंबई.